# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## कार्यकारीणी (निवडक सभासदांची) सभा

**दिनांक** : शनिवार 12 डिसेंबर 2015
**स्थळ** : वैकुंठ पार्क, कै रमेश मोरे उद्यान, तेली गल्ली, अंधेरी – पूर्व, मुंबई.

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 6. श्री दशरथ दत्ताराम साटम |
| 2. श्री उदय भगवान राणे | 7. श्री जयवंत नाना राणे |
| 3. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 8. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 4. श्री पांडूरंग सावजी राणे | 9. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 5. श्री भरत गणपत राणे | 10. श्री मंगेश मनोहर राणे - अनुपस्थित |

फळसेवाडी हितकारी संस्था यांची निवडक सभासदांची बैठक शनिवार दिनांक 12 डिसेंबर 2015 रोजी वैकुंठ, कै रमेश मोरे उद्यान, तेली गल्ली, अंधेरी –पूर्व येथे संपन्न झाली. सभेस एकूण 10 सभासद उपस्थित होते.

सेक्रेटरी श्री सुनिल सदानंद राणे यांनी सर्वांचे स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे अनुपस्थित असल्यामुळे संस्थेचे उपाध्यक्ष श्री पांडूरंग सावजी राणे यांच्या उपस्थितीत सभा सुरू करण्यात आली.

या सभेचा मुख्य उद्देश असा होता की पिसेकामते-फळसेवाडी येथे (गावी) झालेल्या 3 सप्टेंबर 2015 च्या नुसार, फळसेवाडी सर्व सभासदांची सुची बनवून 18 वर्षावरील मुलांमुलींना संस्थेचे सभासद बनवून संस्थेची पुढील वाटचाल ठरविणे. त्यानुसार श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी जमा केलेल्या माहीतीवरून प्रत्येक कुटूंबाच्या कुटूंबप्रमुखाकडे प्रथम फार्म क्रमांक 1 देऊन संपूर्ण कुटूंबाची माहिती दिनांक 16 जानेवारी 2016 पर्यंत भरुन घेऊन त्यानंतर दिनांक 17 जानेवारी 2016 रोजी सभा घेऊन 18 वर्षावरील मुलामुलींचे फार्म भरुन घेऊन त्यानंतर फेब्रुवारी 2016 मध्ये सर्वांची एकत्रित सभा घेऊन संस्थेचे पुढील मार्गक्रमण करण्याचे ठरवावे.

त्यानंतर सेक्रेटरी श्री सुनिल सदानंद राणे, फळसेवाडी ग्रामस्थ श्री रत्नाकर नाना राणे, श्री अंकुश मारुती राणे, श्री प्रकाश राणे इत्यादीकडून 'श्री लिंगेश्वर देवस्थान' मागील दोन वर्षांची वर्गणी देण्याबाबत चर्चा झाली. त्यावेळी सेक्रेटरी श्री सुनिल सदानंद राणे यांनी पिसेकामते विकास मंडळ याचे खजिनदार श्री चंद्रकान्त परब यांच्याशी या विषयावर झालेल्या चर्चेबद्दल माहिती दिली. यावर्षीची वर्गणी संस्थेने गणपती उत्सवामध्ये जमा करून श्री अंकुश मारुती राणे यांचेकडे दिली आहे, त्यावेळी मागील दोन वर्षाच्या वर्गणीबद्दल विषय नव्हता हे ही सांगितले, मग आता ही वर्गणी का घेत नाही अशी विचारणा केली. या विषयावर लगेचच सर्वासमक्ष मोबाईलव्दारे श्री चंद्रकान्त परब आणि श्री पांडुरंग गुरव यांच्याबरोबर चर्चा केली. त्यानंतर श्री ज्ञानेश्वर गुरव, मंदिर सचिव यांच्याशी लगेच चर्चा केली. त्यांनी सांगितले पैसे / वर्गणी हा विषय नसून फळसेवाडीतील प्रतिनिधी ग्रामसभेस उपस्थित राहत नाहीत त्यामुळे समस्या निर्माण होते असे सांगितले. त्याचवेळी सचिवांनी श्री ज्ञानेश्वर गुरव यांना सांगितले फळसेवाडी व श्री लिंगेश्वर मंदिर हे अंतर खुप लांब आहे व वाडीत ज्या तीन-चार व्यक्ती आहेत त्या वयस्कर आहेत तसेच श्री रत्नाकर नाना राणे गोव्यास नोकरीस असतात त्यामुळे आम्हालाही प्रॉब्लेम होतो. तरी वाडीतील श्री अंकुश मारुती राणे हे रिक्शाचालक आहेत, तरुण आहेत

त्यांच्या माध्यमातून गावाच्या हिताचे निर्णय कळविण्यास सोपे  होते. त्यामुळे त्यांचेकडे या वर्षी जमा केलेली वर्गणी स्विकारावी व श्री लिंगेश्वर चरणी अर्पण करावी. आम्ही श्री लिंगेश्वर मंदिराच्या जिर्णोव्दारसाठी उत्सुक आहोत. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी श्री चंद्रकान्त परब, श्री पांडूरंग गुरव व श्री ज्ञानेश्वर गुरव (94057 49084) यांच्याशी चर्चा केली व ही समस्या संपविण्याचा प्रयत्न केला.

यानंतर या संपूर्ण विषयावर श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी फार्म, संस्थेचे नियम या सर्व विषयांवर आपले मत मांडले व हे फार्म लवकरात लवकर इमेलवर पाठवितो असे सांगितले जेणेकरून पुढील कार्यवाही करता येईल.

या सभेस श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी संस्थेचे सभासद होण्यासाठी जमा केलेल्या माहितीचा गोषवारा दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

या सभेस सर्व उपस्थितांचे सचिव श्री सुनिल राणे यांनी आभार मानले व संस्थेची पुढील वाटचाल दमदार होईल याबद्दल आशा निर्माण करून ही सभा सायंकाळी 7:30 वाजता संपली.

---